विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्षे
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४२ वा | मंगळवार, दि. ०५ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

# पंढरपूर कॉरिडॉरला मान्यता, 4150 कोटींचा निधी मंजूर

## 650 कुटुंबाचे करावे लागणार पुनर्वसन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उज्जैन, काशी आणि वाराणसी या तीर्थक्षेत्रांच्या प्रमाणे विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पंढरपूर कॉरिडॉरला मान्यता दिली. या विकास कामांसाठी 4150 कोटींची तरतूद करण्यात आली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची आज घोषणा केली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या डाव्या व उजव्या बाजूचे रस्ते रुंद करुन त्याठिकाणी भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. वारकरी भाविकांना स्वच्छ, गदीर्मुक्त, सुरक्षित आणि आध्यात्मिकदृष्ट्या समाधानकारक अनुभव मिळावा अशी शासनाची भूमिका आहे.

पंढरपूरात वर्षभरात भरणाऱ्या आषाढी, कार्तिकी, चैत्री आणि माघी या 4 मोठ्या यात्रा भरतात. तर महिन्याची एकादशी, पंधरा दिवसाची एकादशीला देखील लाखो भाविक पंढरीत विठ्ठल दर्शनासाठी येतात. तर विकेंड आणि दररोज येणारे हजारो भाविक पाहता भाविकांना अधिकाधिक सेवा सुविधा उपलब्ध देणे कॉरिडॉर मुळे शक्य होणार आहे.

वारकऱ्यांची वारी सुखकर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याकरिता पहिल्या टप्प्यात मंदिर परिसरातील कामांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यामुळे मंदिर परिसरात श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर केंद्र बिंदू मानून कॉरिडॉर राबविण्यात येणार आहे.

पंढरपूर कॉरिडॉरमध्ये 630 ते 650 निवासी मालमत्ता, व्यावसायिक आस्थापना, ऐतिहासिक मठ अशा मालमत्ता बाधित होत आहेत. परंतू, याकरिता नुकसान भरपाई ची ही तरतूद करण्यात आली आहे. राज्यात आतापर्यंत दिला गेला नसेल इतका मोठा मोबदला दिला जाणार आहे. त्यामुळे जागा संपादित करण्याच्या कामात अडथळे येणार नाहीत.


बाधितांना दुकानाच्या बदल्यात दुकान, घराच्या बदल्यात घर दिले जाणार आहे. आषाढी यात्रा सोहळा संपल्यानंतर जिल्हा प्रशासन पंढरपूर कॉरिडॉरवर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करणार आहे.

**ही कामे प्राधान्याने होणार-**

पंढरपूर कॉरिडॉरच्या आराखड्यानुसार शहरातील रस्ते व प्रदक्षिणा मार्गावरील रस्ते विकसित करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर मंदिरांचा जीर्णोद्धार, अद्ययावत वाढीव वाहन तळे व त्यांचा विकास, दर्शन मंडप, स्काय वॉक उभारणी, घाट बांधणी, उद्यान विकास, हेलिपॅड ची उभारणी, पाणी पुरवठा, सांडपाणी प्रक्रिया, भूमिगत गटार योजना, भूमिगत विद्युतीकरण, स्नान ग्रह, शौचालय उभारणी, चेंजिंगरूम, वारकरी निवारा केंद्र, अग्निशमन केंद्र, रेडिओ केंद्र, ट्रामा केअर सेंटर, संत पीठ, पालखी तळ विकास, चंद्रभागा घाटबांधणी, 65 एकर परिसर विकास आदी कामांबरोबर इतर ही विकास कामे करण्यात येणार आहेत.

पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या पाहता शासनाने पंढरपूर कॉरिडॉर राबविण्याचे धोरण आखले आहे. कॉरिडॉर हा येणाऱ्या भाविकांसाठी तसेच स्थानिक नागरिकांसाठी फायदेशीर होईल असे शासनाचे मत आहे.

विकास आराखडा राबविताना बाधित होणाऱ्या घरगुती मालमत्ताधारकांना 20 हजार रुपये प्रति चौरस फुट तर व्यावसायीक मालमत्तांना 40 हजार रुपये प्रति चौरस फुट मोबदला दिला जाणार आहे. बांधितांचे योग्य पुनर्वसन करण्यात येणार आहे. कॉरिडॉरमूळे पंढरपूरला भाविकांची संख्या वाढेल. यामुळे पंढरपूर हे धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून जगाच्या नकाशावर येईल तसेच स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती वाढण्यास मदत होईल व्यावसायीकांचा व्यावसाय अधिक पटीने वाढेल असा प्रशासनाचा कयास आहे.



**कॉरिडॉर अनावश्यक**

पंढरपूर कॉरिडॉर राबवताना बाधितांना विश्वास घेतले जात नाही. त्यामुळे बाधितांकडून सुरुवातीपासूनच कॉरिडॉरला विरोध दर्शवला जात आहे. याकरीता पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीकडून दुकानांवर काळे फलक लावणे, पंढरपूर बंद, मोटार सायकल मोर्चा तसेच सरकारी पडीक जमिनींची शोध मोहिम अशा मोहिमा राबवून कॉरिडॉरला विरोध दर्शवण्यात आला आहे. तरी देखील मुख्यमंत्री यांची कॉरिडॉरला मंजुरी देवून निधी दिला आहे. याबाबत बाधितांशी चर्चा करुन तीर्थक्षेत्र बचाव समिती दोन दिवसात पुढील निर्णय घेईल.

– **अभयसिंह इचगावकर,** अध्यक्ष, तीर्थक्षेत्र बचाव समिती

# रेल्वे गाड्यांचा विशेष दर्जा रद्द; आता कायमस्वरूपी धावणार- खा. धैर्यशील मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** मराठवाड्यातील प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या हरंगुळझ्रपुणे तसेच करमाळाझ्रमाढा तालुक्यात लोकप्रिय असलेल्या दौंड-कलबुर्गी या रेल्वे गाड्यांचा विशेष (स्पेशल) दर्जा रद्द करण्यात आला असून, या दोन्ही गाड्या आता कायमस्वरूपी धावणार असल्याची माहिती खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली. यामुळे या गाड्यांचे तिकीटदरही सुमारे निम्म्यावर येणार आहेत. जेऊर, कुर्डूवाडी, माढा या स्थानकांवरून सोलापूरला सकाळच्या वेळेत जाण्यासाठी पुरेशा गाड्या नव्हत्या. सकाळी साडेपाचची एक गाडी आणि त्यानंतर थेट दुपारी बारा वाजताची गाडी उपलब्ध होती. सकाळी ७ ते ८ दरम्यान सोलापूरसाठी गाडी सुरू करण्याची मागणी प्रवाशांकडून सातत्याने होत होती. यासाठी दौंडझ्र कलबुर्गी गाडी सुरू करण्यात आली होती; मात्र काही काळानंतर ती बंद झाली होती.

लोकसभा निवडणुकीनंतर खासदार मोहिते-पाटील यांनी



सोलापूर येथील डीआरएम कार्यालयात बैठक घेऊन ही गाडी पुन्हा सुरू करण्याची मागणी केली. प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर आता ही गाडी कायमस्वरूपी करण्यात आली असून, गाडी क्रमांकापुढील '०' काढण्यात आले आहे. त्यामुळे तिकीटदरातही घट होणार आहे.

दरम्यान, लातूर व धाराशिव जिल्ह्यातून पुण्याकडे दुपारच्या वेळेत थेट रेल्वे सेवा नव्हती. प्रवाशांच्या मागणीनुसार हरंगुळझ्रपुणे गाडी दुपारी ३ वाजता लातूरहून सुटून रात्री पुण्यात पोहोचत होती. या गाडीला मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, तिकीट सतत वेटिंगमध्ये असायचे.

खा. मोहिते-पाटील यांनी लोकसभेत ही गाडी कायमस्वरूपी करण्याची तसेच हडपसरऐवजी पुणे स्टेशनपर्यंत वाढवण्याची मागणी केली होती. रेल्वे प्रशासनाने ही मागणी मान्य करत गाडी कायमस्वरूपी केली आहे. यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

VNP MOTORS
VNP MOTORS MULTIBRAND CAR SALES & SERVICE
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
Trusted & Approved for Leading Brands
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007
GOVT. APPROVED CNG RETROFITTMENT CENTER & WORKSHOP



## संपादकीय

# विकृतीचा कळस

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामधील नसरापूर येथे एका चार वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार करून तिचा निर्घृण खून करण्याची घटना म्हणजे आधुनिक काळातील विकृतीचा कळसच मानावा लागणार आहे.

कारण या घटनेला जबाबदार असणारा आरोपी हा 65 वर्षांचा ज्येष्ठ नागरिक आहे. यापूर्वी अशाच प्रकारच्या गुन्ह्याखाली शिक्षा भोगर्णाया या नराधमाने पॅरोलवर सुटल्यावर हे दुसरे कृत्य केल्यामुळे त्याची विकृत मानसिकता समोर येते.

या घटनेनंतर पुणे जिल्ह्यासह राज्यभर जो जोरदार प्रक्षोभ उमटला तो समजण्यासारखा आहे. कारण अशा प्रकारच्या घटनांनंतर राजकीय पातळीवर आणि सरकारी पातळीवर अशा नराधमांवर कारवाई करून त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली जाईल असे आश्वासन दिले जात असले, तरी गेल्या काही वर्षांतील घटनांचा अनुभव पाहता असे अनेक नराधम आजही फाशीची वाट बघत आहेत.

या घटनेची चर्चा सुरू असतानाच चाकण येथेही एका तीन वर्षीय मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याचा खून करण्याची घटना घडली, तर विदर्भामध्येसुद्धा एका 75 वर्षीय वृद्धेवर बलात्काराची घटना घडली.

या सर्व घटना विकृत मानसिकतेचे प्रतिनिधित्व करतात. अशा घटनांनंतर गृह खात्याला आणि पोलिसांना जरी दोष दिला जात असला, तरी असा गुन्हा घडल्यावर त्याचा शोध घेणे आणि आरोपींपर्यंत पोहोचून न्यायालयात त्याला शिक्षा होईल अशा प्रकारे साक्षीपुरावे गोळा करणे हे पोलिसांचे काम असते.

परिपूर्ण तपास करून संबंधित आरोपीला कठोर शिक्षा झाली तरच समाजातील इतर संभाव्य गुन्हेगारांना जरब बसू शकते असे गुन्हेशास्त्र सांगते. या विकृत घटनांनंतर गृह खाते सांभाळर्णाया मुख्यमंत्र्यांवर टीकेची झोड सुरू झाली आहे. घटनेनंतर आंदोलकांनी पुण्याजवळ उत्स्फूर्तपणे चार तास रस्ता रोको आंदोलन केले तेसुद्धा प्रतिनिधिक आणि समाजाची मानसिकता स्पष्ट करणारे आंदोलन मानावे लागेल.

अशा प्रकारच्या कोणत्याही घटनेनंतर हा विषय फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालवला जाईल आणि आरोपीला लवकरात लवकर कठोर शिक्षा दिली जाईल अशा प्रकारची घोषणा केली जात असली, तरी भारतातील फास्टट्रॅक न्यायालयांचा वेगही किती फास्ट आहे हे आजपर्यंत लक्षात आले आहे. दिल्लीत घडलेल्या श्रद्धा वालकर प्रकरणाची फास्टट्रॅक न्यायालयात सुनावणी सुरू असूनही साडेतीन-चार वर्षांनंतरसुद्धा अजून या प्रकरणाचा निकाल लागलेला नाही.

अशी अनेक उदाहरणे देता येतील. मुलांवरील किंवा मुलींवरील बलात्कार आणि खुनानंतर फाशीची शिक्षा झालेले अनेक जण त्यांची दया याचिका फेटाळल्यानंतरसुद्धा अद्याप फाशी देण्याच्या प्रतीक्षेत आहेत. साहजिकच भारतीय न्यायप्रणालीची ही अवस्था सर्वांनाच लक्षात घ्यावी लागणार आहे. नसरापूरमधील घटनेबाबत सर्वसामान्य नागरिकांच्या भावना अत्यंत तीव्र स्वरूपाच्या असल्याने सरकारने तातडीने तपास करून लवकरात लवकर आरोपपत्र दाखल करून साक्षीपुरावे समोर आणून या आरोपीला फाशीची शिक्षा होईल हे प्राधान्याने पाहायला हवे.

काही वर्षांपूर्वी अशाच एका घटनेमध्ये पोलिसांनी अवघ्या 48 तासांमध्ये आरोपपत्र दाखल केल्याच्या घटनाही याच महाराष्ट्रात घडल्या होत्या. साहजिकच सर्वसामान्य नागरिकांचा कायदा व सुव्यवस्थेवरील विश्वास जर कायम ठेवायचा असेल आणि समाजात वावरण्याबाबत एक प्रकारची सुरक्षितता वाटायची असेल तर राज्य सरकारने या घटनेच्या तपासाला आणि आरोपपत्र दाखल करण्याच्या विषयाला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशाप्रकारच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपीला पॅरोल कसा मंजूर केला जातो हासुद्धा संशोधनाचा विषय आहे.

साधारणपणे हिस्टरी शीटर म्हणून संभावना होत असणारे हे गुन्हेगार बाहेर आल्यावर पुन्हा एकदा त्याच प्रकारचे गुन्हे करतात असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. साहजिकच बलात्काराच्या आरोपाखाली तुरुंगात शिक्षा भोगर्णाया अशा नराधमाला पॅरोल देर्णाया यंत्रणेचीसुद्धा चौकशी होण्याची गरज आहे. गेल्या वर्षी बदलापूर येथेसुद्धा अशाच प्रकारची घटना घडली होती.

तेव्हा त्या प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर करण्यात आला होता. या नराधमाचासुद्धा एन्काउंटर करण्यात यावा अशा प्रकारची जाहीर मागणी आता करण्यात येत आहे. याकडेसुद्धा सरकारने गांभीर्याने बघायला हवे. कारण उशिरा मिळालेला न्याय हासुद्धा अन्याय असतो हे न्याय यंत्रणेनेच सांगून ठेवले आहे. साहजिकच न्याय हा वेळेवर मिळणे सर्वात महत्त्वाचे असते.

म्हणूनच सर्वसामान्य नागरिकांना आता एन्काउंटर हाच न्याय वाटत असेल तर त्या विषयाकडेसुद्धा सरकारसह संपूर्ण न्यायंत्रणेने गांभीयार्ने बघायला हवे. अशा प्रकारच्या घटना टाळणे पोलिसांच्या किंवा गृह खात्याच्या हातात नसले तरी अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर संबंधित आरोपीला कठोरात कठोर शासन कसे होईल हे पाहणे मात्र पोलिसांच्या हातात असते, हे कधीही विसरून चालणार नाही. अशा प्रकारची विकृत मानसिकता ठेचण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेचा परिपूर्ण वापर करणे, हाच एक पर्याय आहे.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **SULTANA SHARFODDIN SHAIKH** has been changed to new name **SULTANA BEGUM ASIF SHAIKH** for passport issuance.

## CHANGE IN NAME

I am changing my name from **SHRADDHA ROHIT KSHIRSAGAR** To **SHRADDHA NANDKUMAR MATADE** for passport issuance as per document.

## CHANGE IN NAME

I am changing my name from **SULBHA AMOL MUNDE** has been changed to new name **VAISHNAVI AMOL MUNDE** for passport issuance.


# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य - डॉ. राजेंद्र बगाटे

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ६ मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.

शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.

शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही.

त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.

आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची व्यापकता आणि दूरदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी समाजातील असमानतेकडे केवळ दयाभावाने पाहिले नाही, तर ती एक संरचनात्मक समस्या आहे, जी राज्यव्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय दूर होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे ओळखले. म्हणूनच त्यांनी आपल्या कारभारात केवळ सुधारणा न करता, एक प्रकारे सामाजिक क्रांतीच घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळणे हेच खरे लोकशाहीचे तत्त्व होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर सामाजिक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ आरक्षण लागू केले नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. त्यांनी मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये स्थान देताना त्यांच्या प्रशिक्षणाची,



कौशल्यविकासाची आणि आत्मविश्वास वाढवण्याचीही काळजी घेतली. त्यांच्या मते, संधी देणे हे पहिले पाऊल आहे, परंतु त्या संधीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक साधने आणि वातावरण उपलब्ध करून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी समाजातील उच्चवर्गीयांच्या वर्चस्वाला थेट आव्हान दिले. त्या काळात ब्राह्मणवगार्चे प्रशासन, शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रांवर मोठे वर्चस्व होते. शाहू महाराजांनी या वर्चस्ववादी रचनेला धक्का देण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी समाजातील इतर घटकांना सशक्त करून एक समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली.

शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली.

शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धमार्ला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती.

शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला.

आजच्या काळात शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना आपण त्यांच्या धोरणांचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आज भारतात शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि स्त्रीसक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रगती झाली आहे, परंतु अजूनही अनेक आव्हाने अस्तित्वात आहेत. समाजातील काही घटक अजूनही शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत. आरक्षण धोरणांवर आजही मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि वादविवाद होत आहेत. काहीजण आरक्षणाला विरोध करतात, तर काहीजण त्याचे समर्थन करतात. या वादांच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी आरक्षणाला एक तात्पुरती पण आवश्यक उपाययोजना मानली होती, जी समाजातील विषमता दूर करण्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या काळात 'मेरिट' या संकल्पनेवरही मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. काहीजण असा युक्तिवाद करतात की, आरक्षणामुळे गुणवत्ता कमी होते. परंतु शाहू महाराजांनी स्पष्टपणे दाखवून दिले की, गुणवत्ता ही केवळ जन्मावर अवलंबून नसून, ती संधी आणि संसाधनांवर अवलंबून असते. जेव्हा समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळतील, तेव्हाच खरी गुणवत्ता विकसित होऊ शकते. शाहू महाराजांच्या कार्यातून आपल्याला हे शिकायला मिळते की, समाजातील परिवर्तनासाठी केवळ कायदे आणि धोरणे पुरेशी नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते. त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आणि समतेच्या मूल्यांचा प्रसार केला.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक न्यायाचे स्वरूप बदलत आहे. नवीन प्रकारच्या विषमता निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला समतेचा आणि न्यायाचा संदेश आजही तितकाच लागू आहे. राजर्षी शाहू महाराजांचा स्मृतिदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस असला, तरी तो आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवसही आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा सखोल अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, त्यांनी ज्या प्रकारे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांना आपल्या कारभाराच्या केंद्रस्थानी ठेवले, ते आजच्या आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठीही अत्यंत मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य केवळ एका संस्थानापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेवर पडला. त्यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी जे उपाययोजना केल्या, त्या आजही सामाजिक धोरणांच्या मुळाशी आढळतात.

आजच्या भारतात संविधानिक पातळीवर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये मान्य केली गेली आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची व्यवस्था केली गेली आहे. स्त्रियांसाठी विविध सक्षमीकरणाच्या योजना राबवल्या जात आहेत. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व प्रक्रियांमध्ये शाहू महाराजांच्या विचारांची छाप स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी मांडलेली ह्यसमान संधीह्व ही संकल्पना आजच्या धोरणांचा पाया बनली आहे.

तथापि, आजच्या काळात सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीत अनेक आव्हानेही आहेत. आरक्षण धोरणांवर राजकीय हस्तक्षेप वाढला आहे, काही ठिकाणी त्याचा गैरवापरही होत असल्याची टीका केली जाते. 'क्रीमी लेयर', आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, खाजगी क्षेत्रातील आरक्षण यांसारखे अनेक नवीन प्रश्न उद्धवले आहेत. या सर्व प्रश्नांचा विचार करताना शाहू महाराजांच्या मूलभूत तत्त्वांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. आरक्षण ही केवळ सवलत नसून, ती ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्याची प्रक्रिया आहे.

आजच्या समाजात ह्यमेरिटह्व या संकल्पनेभोवतीही मोठा वाद आहे. काहीजण आरक्षणाला गुणवत्ता कमी करणारे मानतात, तर काहीजण ते सामाजिक समतेसाठी आवश्यक मानतात. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, संधी मिळाल्याशिवाय कोणतीही गुणवत्ता विकसित होऊ शकत नाही. त्यामुळे आरक्षण आणि मेरिट हे परस्परविरोधी नसून, आरक्षणामुळेच खऱ्या अर्थाने गुणवत्ता विकसित होऊ शकते.

जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक आणि सामाजिक विषमता नव्या स्वरूपात पुढे येत आहेत. तंत्रज्ञानामुळे काही नवीन संधी निर्माण झाल्या असल्या, तरी डिजिटल दरी, शैक्षणिक असमानता आणि रोजगाराच्या संधींमधील विषमता यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी दिलेला समतेचा संदेश आजच्या बदलत्या काळातही मार्गदर्शक आहे.

शाहू महाराजांनी समाजपरिवर्तनासाठी केवळ धोरणात्मक बदल केले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांमध्ये समतेची, बंधुत्वाची आणि सहिष्णुतेची भावना निर्माण केली. आजच्या काळातही सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी करण्यासाठी समाजातील मानसिकतेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी प्रशासनाला लोकाभिमुख बनवले. त्यांनी सत्तेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केला. आजच्या काळातही प्रशासन अधिक संवेदनशील, पारदर्शक आणि लोककेंद्रित बनवण्याची गरज आहे. या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी ठरते.

राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण केवळ त्यांना श्रद्धांजली अर्पण करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. सामाजिक न्याय ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

आजच्या भारतात समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. शिक्षण, आरक्षण, स्त्रीसक्षमीकरण, आर्थिक विकास आणि सामाजिक ऐक्य या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास समाज अधिक प्रगत आणि समतावादी बनू शकतो. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, हीच खरी लोकशाही आहे. शाहू महाराजांनी आपल्या कार्यातून हीच संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक परिवर्तनासाठी धाडस, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपणही समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

शेवटी, राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य हे भारतीय समाजाच्या इतिहासातील एक उज्ज्वल पर्व आहे. त्यांनी समतेचा दीप प्रज्वलित केला, सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवला आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प करूया. त्यांच्या आदर्शांचा अवलंब करून आपण एक समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त भारत निर्माण करू शकतो हीच त्यांना खरी आणि अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल.

डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com


## आरोग्यविषयक

### मुळव्याध आहे ?

ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.

**संपर्क :**

**कुदरत हर्बल्स किल्लारी**
**ता: औसा जि. लातुर**
मो.नंबर 9970115450


# हातबलता नागरिकांची की व्यवस्थेची ?
# माणुसकी पेक्षा कागदच मोठा....!

काल परवा व्हाट्सअप वर हतबल झालेल्या व्यक्तीचा एक फोटो व माहिती फिरत होती. ओडिशातील केओंझार जिल्ह्यात घडलेली घटना केवळ हृदयद्रावक नाही, तर संवेदनाहीन व्यवस्थेच्या तोंडावर मारलेली चपराक. माणुसकीला काळीमा फासणारी घटना. व्यवस्था व कागदामध्ये अडकलेल्या माणसाची काय अवस्था होते ते जगाने पाहिले. फक्त 19,300 रुपयांसाठी व्यवस्थेविरुद्ध एका गरीब, हतबल, आदिवासी बांधवांचा मूक आक्रोश पाहिला. व्यवस्थेच्या क्लिष्ट नियमांनी आणि बँकिंग यंत्रणेच्या अमानुष वर्तनाने एका गरीब आदिवासी बांधवाला इतकं हतबल केलं की, त्याने आपल्या मृत बहिणीचा सांगाडाच बँकेत आणून 'हा घ्या पुरावा, आता तरी माझे पैसे द्या' अशी हाक दिली.

बहिणीच्या खात्यातील पैसे काढण्यासाठी जीतू काही दिवसांपूर्वी बँकेत गेले होते. मात्र मृत्यू प्रमाणपत्र, कायदेशीर वारसदाराचा दाखला आणा, असे सांगून त्यांना अनेकदा परत पाठवण्यात आले. अशिक्षित, गरीब आणि कागदपत्रांविना जगणाऱ्या आदिवासी माणसासाठी ही प्रक्रिया अशक्यप्राय होती. कायदेशीर प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती नसल्याने तो त्रस्त होऊन गेला. पण बँकेच्या यंत्रणेला त्याची वेदना कळली नाही. म्हणून जीतूने टोकाचे पाऊल उचलले. भारतीय संविधान आम्हाला स्वातंत्र्य, बंधुता, समानतेची हमी देतं. पण त्यावर चालणारी व्यवस्थाच जर व्यवहारात माणुसकी जपत नसेल तर अशा सांगाड्यांनाच जागोजागी पुरावे बनून अग्नी परीक्षा द्यावी लागेल काय ? जन्म व मृत्यूच्या नोंदीची जबाबदारी ही स्थानिक ग्रामपंचायतीकडे असते, जर ग्रामपंचायतने सदर व्यक्तीला त्याच्या बहिणीचे मृत्यू प्रमाणपत्र दिले असते तर कदाचित त्या व्यक्तीला न्याय मिळाला असता आणि पैसे ताबडतोब भेटले असते. परंतु मदमस्त ग्रामपंचायत, उदासीन ग्राम सचिव, आणि निरक्षरांची हेटाळणी करणारी यंत्रणा कधी सुधारणार ? बरं हे प्रकरण प्रकाश झोतात आले म्हणून सर्वांना कळले. अशा कितीतरी घटना आहेत दररोज घडत आहेत की त्या आपल्यापर्यंत पोहचत नाहीत आणि पोहचल्या तरी आपण हातबल. व्यवस्थे विरुद्ध काहीच करु शकत नाही.

महाराष्ट्रात तर तासंतास बॅंकेत खातेदारांना बसवले जाते. सर्रास राष्ट्रीयकृत किंवा इतर बॅंकेत हिंदीतून बोलले जाते. जे ग्रामीण भागातील खातेदारांना कळत नाही. या टेबलवरून त्या टेबलवर फिरवले जाते. बॅंकेचा वॉचमन असा वागतो की तो बॅंकेचा मालकच. त्यामुळे ग्रामीण भागात मराठी किंवा त्यांना समजून घेणारे कर्मचारी का भरले जात नाही ? संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल की संविधान कितीही चांगले असले तरी, ते राबवणारे लोक (राज्यकर्ते) जर वाईट असतील, तर संविधान निश्चितपणे वाईट ठरेल. उलटपक्षी, संविधान कितीही वाईट असले तरी, ते राबवणारे लोक जर चांगले असतील, तर ते संविधान चांगले ठरेल ! फक्त संविधानच नाही तर प्रत्येक छोटे मोठे कायदे, ज्यांची अंमलबजावणी स्थानिक नोकरदाराकडून व्हायला पाहिजे ते नोकरदार जर "उच्च प्रतीचे वाईट" असतील तर जनतेला मनःस्तापाशिवाय दुसरे काहीच भेटत नाही.

आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे पण शासकीय रुग्णालये नेहमी आजारीच असतात. डॉक्टर कधी येतात कधी जातात तेच समजत नाही. व्यवस्था इतकी खराब की बोलूच नका आणि वॉर्डबॉय, सिस्टर, शिपाई यांची रुग्णाला अरेरावीची भाषा असते. आरोग्य विभागाच्या अनास्था, अपुरे मनुष्यबळ, औषधांचा तुटवडा, आधुनिक तंत्रज्ञान, मशिनची कमतरता अशा अनेक कारणांमुळे रुग्णालये आजारी दिसतात. राज्यातील सामान्य जनतेला विविध शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देणारे "आपले सरकार" हे वेब पोर्टल सारखे तांत्रिक अडचणींमुळे बंदच असते त्यामुळे असंख्य नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतोय.

मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी राज्यामध्ये सुरु आहे. असे असताना सध्या सर्वत्र डोनेशनचा घोडेबाजार सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. यामुळे ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याच्या शासनाच्या योजनेचे अक्षरशः तीनतेरा वाजल्याचे पाहायला मिळत आहे. केवळ शासकीय शाळांमध्येच या नियमाची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसते. अन्यत्र मात्र प्रवेशासाठी शाळेला मदतीच्या स्वरुपात खुलेआम डोनेशन मागितले जात आहे. ट्युशन व अकॅडमी चे फॅड तर वेगळेच. त्यामुळे शिक्षणव्यवस्थे विषयी न बोललेलेच बरे. खरेतर "कागदांपेक्षा माणुसकी मोठी असते" पण आज शासकीय व्यवस्थेत "माणुसकी पेक्षा कागदच मोठा झालेला दिसतो.... !"

**प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर,**
अकलूज ९२२६१४४८३६
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून ते शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)


**शिनगारे सिटी वासुद रोड**
**अल्टिमेट जिमच्या समोर**
**सांगोला**
**प्लॉट देणे आहे**
**N.A.**
**3100 sft- 3200 sft**
- : संपर्क : -
**शिनगारे.जे.एम**
**8275274353**
**डी.बी.शिंदे**
**9579421465**


## वात्रटिका

### करा काशी आता

निकाल लागला नि कळले
कोण जिंकले कोण हारले...
कोणाचे दिवस आले तर
कोणाचे दिवस सरले...
कोणी आले नि कोणी गेले
जनता जाग्यावर तशीच आहे...
काम संपले आता नेत्यांचे
पाच वर्षे लोकांची काशीच आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बौध्द पोर्णिमे निमित्त अकलुज येथे भगवान बुद्धांना अभिवादन




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** विश्वातील प्राणीमात्राच्या कल्याणासाठी सद्धमाचा कल्याणकारी मार्ग दाखवणारे महाकरुणी तथागत भगवान बुद्ध यांच्या 2570 व्या जयंतीनिमित्त अकलुज येथील सारनाथ बुध्द विहारात परीसरातील हजारो बौध्द अनुयांयीनी अभिवादन केले.सायंकाळी अकलुज शहरातुन भगवान बुध्द व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक काढण्यात आली होती.

तथागत भगवान बुध्दाचा जन्म, ज्ञानची प्राप्ती व महापरिनिर्वाण या तिन्ही घटना वैशाखी पोणीर्मेला घडल्याने संपुर्ण जगात हा दिवस बौद्ध पोणीर्मा म्हणून साजरा केला जातो.अकलुज येथे बौद्ध पोणीर्मे निमीत्त सारनाथ बुध्द विहार येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात सकाळी बुध्द वंदना व सुत्तपठण घेण्यात आले.तदनंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील,मा.आ.रणजितसिंह मोहिते-पाटील,नगराध्यक्षा रेश्मा अडगळे,उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील,मुख्याधिकारी सचिन पाटील, नगरसेवक सचिन देशमुख, मोहसीन शेख, मिलिंद कोतमिरे, राहुल लोंढे, विशाल मोरे,नाशिक सोनवणे,प्रियंका गायकवाड, मनिषा तिकोटे,जयश्री एकतपुरे, मृदुला सुर्यवंशी, आदीनी तथागताच्या मुर्तीरुपास पुष्प अर्पन करुन अभिवादन केले.यावेळी उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.यावेळी माजी सरपंच विठ्ठलराव गायकवाड, दादासाहेब मोरे,किरण धाईजे, सुशांत गायकवाड,भारतीय बौध्द महासभाचे दिलीप वाघमारे, बाळासाहेब गायकवाड, नागेश लोंढे,संतोष पाटील, गणपत जाधव, प्रल्हाद गायकवाड, प्रविण लोंढे आदीसह बहुसंख्येने बौध्द उपासक उपस्थित होते.

सायंकाळी अकलुज येथे भगवान बुद्ध व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक काढण्यात आली होती.या मिरवणुकीत बहुसंख्य बौध्द अनुयांयी सहभागी झाले होते.बौध्द पोर्णिमेच्या निमित्ताने खिरदान व भोजनदान करण्यात आले होते.

बौध्द पोर्णीमेनिमित्त भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्हा पश्चिम विभाग व माळशिरस तालुका शाखेच्या वतीने आदरणीय भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली अकलुज-शंकरनगर येथील संस्थेच्या कार्यालयात कार्यालय परीसरात 2570 मेनबत्या एकाच वेळी प्रज्वलीत करुन दिपोत्सव साजरा करण्यात आला होता.

# भोंदू बाबांपासून सावध रहा : शिवलीलाताई पाटील यांचा इशारा



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त) :-** जगद्गुरू तुकोबारायांनी कधीही ह्यमाज्या चरणावर मस्तक ठेवा, मी तुमचे कल्याण करेनह्ल असे सांगितले नाही. मात्र आजकाल काही भोंदू बाबा लोकांना पाया पडायला लावतात, ही चुकीची प्रवृत्ती असून समाजाने अशा भोंदूगिरीला ओळखले पाहिजे, असे परखड प्रतिपादन प्रसिद्ध कीर्तनकार शिवलीलाताई पाटील यांनी केले.

येथील शिवशंभो महिला पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात त्या बोलत होत्या. आपल्या प्रभावी वाणीमधून त्यांनी समाजप्रबोधन करत अंधश्रद्धेविरोधात जागृतीची गरज अधोरेखित केली.

कीर्तनादरम्यान त्यांनी दलित मित्र स्व. कदम गुरुजी यांच्या कायार्चे स्मरण केले. 'कदम गुरुजींनी शैक्षणिक संस्था सुरू केली तेव्हा अनेकांनी विरोध केला, तरीही त्यांनी हार मानली नाही. आज त्यांच्या तिसऱ्या पिढीतही तेच संस्कार दिसून येतात,' असे त्या म्हणाल्या. तसेच, 'या भूमीत संत दामाजी, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा यांसारखे महान संत होऊन गेले; मात्र दुर्दैवाने जिथे पिकते तिथे विकत नाही,' असेही त्यांनी नमूद केले.

राजमाता जिजाऊंनी

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी पहिली पतसंस्था सुरू करून बी-बियाणे व शेती अवजारे उपलब्ध करून दिली. हा वारसा पुढे नेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास नगराध्यक्षा सुनंदा आवताडे, अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, डॉ. मीनाक्षी कदम, प्रा. तेजस्विनी कदम, डॉ. प्रियदर्शनी महाडीक, पवन महाडीक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी शिंदे यांनी केले, तर आभार अशपाक काझी यांनी मानले.

**सोलापूर महानगरपालिका,सोलापूर**
**आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन**

## जाहिर प्रसिध्दीकरण

सोलापूर महानगरपालिका, आरोग्य विभाग या कार्यालयामार्फत सन. २०२६-२७ या आर्थिक वर्षात सोलापूर महानगरपालिकेच्या **जननी शिशू सुरक्षा या योजनेअंतर्गत** आरोग्य खाते अंतर्गत प्रसुती गृहातील प्रसुती मातांना प्रसुती दिनांकापासून स्वाभाविक प्रसुती माताना तीन दिवस व सिझेरियन प्रसुती मातांना सात दिवस मोफत आहार देण्यात येणार आहे. यासाठी ई-निविदा करणेबाबत

Tender ID No-2026-SMC-1299876_1,

वर नमूद कामाचे टेंडर मा. शासनाच्या http/wwwmahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.०५/०५/२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**सही/-**
**(डॉ. राखी सुहास माने) आरोग्याधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र

**आमच्याकडे सगळया समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

अशी नोटीस देण्यात येते की, या खालील परिशिष्टात जिचे विस्तृत वर्णन करण्यात आले आहे अशा जमिनींच्या तुकड्यांचा ज्यामध्ये समावेश होतो अशा मिळकतीबाबतचे व्यक्ती / संस्थाचे मालकी हक्काधिकार हितसंबंधांची तपासणी करण्याबाबतच्या सूचना आमचे अशिलांनी आम्हास दिलेल्या आहेत.

यान्वये अशी विनंती करण्यात येत आहे की, केवळ एखादी व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ) कंपनी/कंपन्या बँक / बँका, एक/ अनेक वित्तसंस्था, एक / अनेक नॉन बँकिंग वित्तसंस्था, पेढी / पेढ्या,मर्यादित दायित्वाची भागीदारी / भागीदाऱ्या, नोंदणीकृत असणारी अगर नसणारी एक / अनेक व्यक्तिसमूह किंवा व्यक्तींची एक / अनेक संस्था, एक / अनेक सावकार आणि / अथवा धनको आणि / अथवा प्राधिकरण यांचाच नव्हे, तर त्यांचेसह इतर अमर्याद व्यक्ती / अनेक व्यक्ती, संस्था / अनेक संस्था यांचे सदरील मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणत्याही प्रकारे किंवा कशाही प्रकारे किंवा कोणत्याही कारणास्तव, विक्री, अदलाबदल, गहाण / गहाणखत (इक्विटेबल किंवा इतर प्रकारे, बोजा, बक्षीस, विश्वस्त म्हणून, तबदील, वारसाहक्क, पोटगी, अभिहस्तांतरण, कुळ, उत्तराधिकार मृत्युपत्रान्वये मिळावयाचे लाभ, भागीदारी, संयुक्त उपक्रम, विकसन हक्क, रस्तावहिवाटीचे अधिकार, ताबा, विवाद प्रलंबन (लिस पेंडन्स), आरक्षण, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा भाडेपट्ट्याचा परवाना, लिन, भार, हिस्सा, तारण, हायपोथिकेशन क्रेडिट सुविधा, किसान क्रेडिट कार्ड, वहिवाट, साभाळकर्ता तत्त्वाने, धारणाधिकार, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड किंवा इतर कोणतीही व्यवस्था, जप्ती, कोणत्याही न्यायालयाने, समन्यायिक प्राधिकरणाने, न्यायाधिकरणाने महसूल आयोग, मंच, निर्णय देणारी प्राधिकरणे किंवा वैधानिक प्राधिकरणाने किंवा लवादाने पारीत केलेली कोणतीही मनाई, स्थगिती किंवा कोणताही हुकूमनामा, आदेश (अंतिम किंवा अंतरिम) न्यायनिर्णय किंवा निवाडा, चिरभोग हक्क किंवा अग्रहक्क किंवा कोणत्याही समजुतीच्या करारनाम्यांतर्गत किंवा कोणताही करार मदार / करारनामा, विक्रीचा करारनामा, भाडेकरारनामा कुलमुखत्यारपत्र प्रदान पत्र, पर्याय, एफ.एस.आय. वापर, टीडीआर / विकसन क्षमता, नकाराचे अधिकार किंवा इतर प्रकारे केलेले संपत्तीव्यवस्थापन, कर्जे, अग्रिम / उचल, कोणत्याही दायित्वाकामी असलेली वचनबद्धता अन्वये अगर वगैरे प्रकारे कोणतेही लाभ, मालकी हक्काधिकार, दावे, हरकती मागण्या, हिस्सा किंवा हक्काधिकार किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी आम्हास लेखी स्वरूपात त्याबाबतची माहिती कागदोपत्री पुराव्यासह आमच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर म्हणजेच पता: **जेएसए ॲडव्होकेट्स ॲड सॉलिसिटर्स कार्यालयाचा पत्ता: वन लोढा प्लेस, २७ वा मजला, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई, महाराष्ट्र- ४०००१३ ईमेल आयडी:** rachana.magdum@jsalaw.com येथे सदरची नोटीस प्रसिद्ध झालेचे दिनांकापासून १५ दिवसांच्या आत पाठवावी आणि तसे न केल्यास, अशा व्यक्तीने / व्यक्तींनी त्यांचे असे हक्क, मालकी हक्काधिकार, हितसंबंध असलेली मिळकत हिस्सा, दावा, लाभ, मालकी हक्क, हरकत आणि / अथवा मागणी असल्यास, सोडून दिले आहेत आणि / अथवा त्यांचा त्याग केला आहे. (अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे असे समजले जाईल अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त भारमुक्त आहेत असे समजून, आमचे अशील जागामालकांशी खरेदी अथवा भाडेपट्टा वा इतर पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस, ती सदर मिळकतींवर, आमचे अशिलांवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

## परिशिष्ट

१) पोट तुकडी तालुका **अक्कलकोट** जिल्हा **सोलापूर** च्या हद्दीमध्ये समाविष्ट असणाऱ्या गाव **हत्तीकणबस** येथील नमट तक्त्यातील शेतजमीन मिळकती यासी एकण क्षेत्र **१०५ हेक्टर ८८ आर** क्षेत्राची.

| अ.नं. | गट नं | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर | अ. नं. | गट नं | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २८/१/ब/१ | श्रीशैल भीमराया माळी | २.२७ | २७ | ९६ | पंचय्या इरय्या स्वामी व इतर ४ | ४.१४ |
| २ | २८/१/ब/१ | विजयालक्ष्मी श्रीशैल माळी | १.१५ | २८ | ९७/१ | शंकरय्या शिवशरण स्वामी | १.८७५ |
| ३ | ३०/२ | माणिक अण्णाराव साळुंखे | ४.५७ | २९ | ९७/३ | सुनिता मलय्या स्वामी | २.४४ |
| ४ | ३०/३ | शंकर मुरालीधर साळुंखे | ४.५८ | ३० | ९९ | विजयकुमार जगदेवप्पा बिराजदार | १.२८ |
| ५ | ३०/४ | मोहन मुरलीधर साळुंखे | ४.६९ | ३१ | १००/१ | संगम्मा शिवानंद बिराजदार | १.८७ |
| ६ | ३१/२ | चंद्रशा लक्ष्मण गायकवाड व इतर१ | ३.७५ | ३२ | १००/२ | विजयकुमार जगदेवप्पा बिराजदार | ०.८५ |
| ७ | ३२/१ | मल्लिकार्जुन शिवान्प्पा मसुती | १.७२ | ३३ | १०१/१ | शंकर सिद्धप्पा बिराजदार | २.०० |
| ८ | ३३/१/अ | मानता मारुती शिंदे | २ | ३४ | १०१/१ | सविता सिद्धप्पा बिराजदार | २.०० |
| ९ | ३३/१/क | श्रीमंत मारुती शिंगे | ३.२३ | ३५ | १०१/१ | विशाल सिद्धप्पा बिराजदार | २.०० |
| १० | ३३/१/ब | मारुती शांतप्पा शिंगे व इतर ५ | २ | ३६ | १०१/५ | गजराबाई बसन्ना बिराजदार | १.६ |
| ११ | ३३/२ | भौरम्मा श्रीशैल पुजारी | १.३१ | ३७ | १०१/६ | बसन्ना शंकरेप्पा बिराजदार | १.२ |
| १२ | ३६/१ | चंद्रशा हेमू गायकवाड व इतर ५ | ०.४२ | ३८ | १०८/१ | उमेश दत्तात्रेय कुलकर्णी | ४.२२ |
| १३ | ३७/१ | विक्रम दादप्पा गायकवाड व इतर१ | ०.५६ | ३९ | १०८/२ | राहुल अरविन्द कुलकर्णी व इतर१ | ४.२२ |
| १४ | ३८/१ | राजप्पा शेटप्पा गायकवाड व इतर२ | ०.७६ | ४० | १११/१ | बसवणप्पा रेवणप्पा धनाळे | १.१७ |
| १५ | ४०/१ | राजप्पा शेटप्पा गायकवाड | १.२४ | ४१ | १११/२ | प्रकाश रेवणप्पा धनाळे | ०.८३ |
| १६ | ४९ | भीमाशा शंकर गायकवाड | २.१६ | ४२ | ११२/१/अ | लक्ष्मण सोमनाथ सरवसे व इतर४ | १.४६ |
| १७ | ५०/१ | लक्ष्मण सिंधू गायकवाड व इतर २ | ३.९ | ४३ | ११२/१/ब | कविता प्रकाश भोसगी | ०.८१ |
| १८ | ५१/१ | मच्छिंद्र मल्कप्पा गायकवाड | १.११ | ४४ | ११३/५ | शिवपुत्र शंकर उन्नद व इतर ५ | २.२९ |
| १९ | ५१/२ | रामचंद्र मल्कप्पा गायकवाड | १.११ | ४५ | ११४/१/अ | चंद्रशेखर दरेप्पा उन्नद | १.२२ |
| २० | ५१/३ | शंकर मल्कप्पा गायकवाड | १.११ | ४६ | ११४/१/ब | दरेप्पा चंद्राम उन्नद | ०.४२ |
| २१ | ५१/४ | बसण्णा मल्कप्पा गायकवाड व इतर१ | १.२६ | ४७ | ११४/२ | चंद्रशेखर दरेप्पा उन्नद | १.६३ |
| २२ | ५२ | हसेनी तुकाराम खांडेकर व इतर ८ | २.६२ | ४८ | १२१/२ | धोंडाबाई कल्लाप्पा माळी | ३.२४ |
| २३ | ५३/१ | महादेव पंडित बिराजदार | ३.२ | ४९ | १२२/२ | धोंडाबाई कल्लाप्पा माळी | २.८३ |
| २४ | ५३/२ | लक्ष्मण तुकाराम ढोर (धडके) | ४.२२ | ५० | १२३/१ | राजकुमार दरेप्पा उन्नद व इतर ३ | १.८२ |
| २५ | ५४ | मीनाक्षी शंकर धडके | २.२३ | ५१ | १२३/२ | बसवराज भीमशा उन्नद | २.२५ |
| २६ | ५५ | मीनाक्षी शंकर धडके व इतर ३ | २.२७ | | | | |
| **एकूण क्षेत्र १०५ हेक्टर ८८ आर** | | | | | | | |
| **एकूण क्षेत्र २६४.७० एकर** | | | | | | | |

२) पोट तुकडी तालुका **अक्कलकोट** जिल्हा **सोलापूर** च्या हद्दीमध्ये समाविष्ट असणाऱ्या गाव **चिक्केहळ्ळी** येथील नमूद तक्त्यातील शेतजमीन मिळकती यासी एकूण क्षेत्र **३४ हेक्टर ३७ आर** क्षेत्राची शेतजमीन मिळकत.

| अ.नं. | गट नं | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर | अ.नं. | गट नं. | शेतकऱ्याचे नाव | क्षेत्र हेक्टर आर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४८/१ | स्नेहल संतोष साळुंखे व इतर १ | ४.७२ | ६ | २६६/२ | अबेदा मुक्तुमसो पटेल | ३.९८ |
| २ | १४८/२ | सुजय हणमंतराव साळुंखे | ४.७२ | ७ | २६७/१ | सैपन मुलुक मुक्तूमसो पटेल | २.६६ |
| ३ | १४८/३ | संग्रामसिंह हणमंतराव साळुंखे | ४.७१ | ८ | २६७/२ | इस्माईल मुक्तूमसो पटेल | २.६४ |
| ४ | १७१/३ | स्वस्तिक बाळासाहेब देसाई | ५.०१ | ९ | २६७/३ | मशाक मुक्तूमसो पटेल | २.६५ |
| ५ | २६६/१ | इब्राहीम उर्फ मुक्तुमसो नाबिसो पटेल | ३.६५ | | | | |
| **एकूण क्षेत्र ३४ हेक्टर ३७ आर** | | | | | | | |
| **एकूण क्षेत्र ८६.८५ एकर** | | | | | | | |

**दिनांक: ०४ मे २०२६**
**ठिकाण:-सोलापूर**

**सही /-**
**ॲड. जेएसए ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स**
**कार्यालयाचा पत्ता: वन लोढा प्लेस, २७ वा मजला, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई, महाराष्ट्र ४०००१३**

# मंगळवेढा तालुक्याचा बारावी निकाल ८०.१० टक्के; सलग दुसऱ्या वर्षी घसरण

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा मंगळवेढा तालुक्याचा निकाल सलग दुसऱ्या वर्षी घसरत ८०.१० टक्के लागला आहे. कॉपीमुक्त अभियान आणि कडक परीक्षा पद्धतीमुळे यंदा निकालात ५.४४ टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून आले.

२०२४ साली तालुक्याचा निकाल ९७ टक्के होता. तो गतवर्षी ८५ टक्क्यांवर आला आणि यंदा आणखी घसरत ८० टक्क्यांवर पोहोचला. शिक्षण मंडळाच्या कॉपीमुक्त उपक्रमामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा निकाल अधिक अर्थपूर्ण ठरल्याचे मत व्यक्त होत आहे.

तालुक्यातून २९६० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी २९०० विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यापैकी २३२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ५४ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवले असून ३५२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, १३२४ द्वितीय श्रेणीत तर ५९३ तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे कॉपीवर मोठ्या प्रमाणात आळा बसला, त्याचा परिणाम निकालावर दिसून आला. विशेषत: प्रथम श्रेणीतील विद्यार्थ्यांची संख्या यंदा कमी झाली. निकालात मुलींनी बाजी मारली.

तालुक्यातील शारदा सिद्धनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, पाटखळ या एकमेव संस्थेचा निकाल १०० टक्के लागला. तर डोणज येथील महासिद्ध विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजचा निकाल सर्वात कमी लागला.

शाखानिहाय गुणवंतांमध्ये कला शाखेत पाटखळच्या शारदा सिद्धनाथ ज्युनिअर कॉलेजचा विनायक बाळू काटकर (८१.५०%), विज्ञान शाखेत माध्यमिक आश्रमशाळा व ज्युनिअर कॉलेजची गाथा दत्तात्रय हजारे (९०.१७%), वाणिज्य शाखेत श्रावणी घुले (८३.५०%) आणि व्यावसायिक शिक्षणात इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेजची भाग्यश्री चौगुले (८५%) यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा ९२.७१% निकाल; विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा एकूण निकाल ९२.७१ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

महाविद्यालयात कला शाखेत परीक्षेस बसलेल्या ३१२ पैकी २८०, वाणिज्य शाखेत २०३ पैकी १९७ तर विज्ञान शाखेत २३२ पैकी २३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

कला शाखेत वैष्णवी गुरव (८४.६७%), वैष्णवी क्षीरसागर (८०.६७%) व वर्षाराणी नेटके (७९.६७%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत यश्वी वासाणी (९१.१७%) प्रथम, प्रतिक खिलोशिया (८४.६७%) द्वितीय तर निलेश शिंदे (८४%) तृतीय ठरले. विज्ञान शाखेत शिवांजली कुदळे (७५.६७%), ओंकार बोरगांवकर (७२.३३%) व ऋतुजा झिंजाडे (७२.१७%) यांनी पहिले तीन क्रमांक पटकावले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष मिलिंद फंड, प्रभारी प्राचार्य डॉ. ए. पी. माने, वरिष्ठ विभाग उपप्राचार्य डॉ. अनिल साळुंखे, कनिष्ठ विभाग प्रशासन अधिकारी संभाजी किर्दाक, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले.

# घोषणा, भूमिपूजन आणि पत्रांचा खेळ

## उड्डाणपुलांची कामे रखडली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रस्तावित दोन उड्डाणपुलांचा प्रकल्प गेल्या दहा वर्षांपासून केवळ कागदोपत्रीच अडकून पडल्याचे चित्र आहे. भूसंपादनासाठी महापालिका व जिल्हा प्रशासनाने सव्वा वर्षात सहा वेळा शासनाला पत्रे पाठवूनही अद्याप ह्यएनओसीह्ल मिळालेली नाही. नुकत्याच झालेल्या दौऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्लपत्र घेऊन या, बैठक लावून मार्ग काढूह्व असे सांगितल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दोन उड्डाणपुलांची घोषणा २०१६ मध्ये झाली होती. २०१८ मध्ये मंजुरी मिळाल्यानंतर २०२२ पासून भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली. मात्र आठ वर्ष उलटूनही ती पूर्ण झालेली नाही. २०२४ पासून ही जबाबदारी महापालिकेकडे आल्यानंतर काही प्रमाणात गती मिळाली असली तरी प्रकल्प अद्याप रखडलेलाच आहे. दरम्यान, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने १२ किलोमीटर लांबीच्या या दोन्ही उड्डाणपुलांसाठी १०९७ कोटी रुपयांची निविदा २०२४ मध्ये काढली; मात्र जागा ताब्यात नसताना निविदा काढण्यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२५ या कालावधीत महापालिकेने चार आणि जिल्हा प्रशासनाने दोन अशी एकूण सहा पत्रे राज्य व केंद्र शासनाच्या संबंधित विभागांना पाठवली आहेत. जागा हस्तांतरणासाठी ही पत्रव्यवहार करण्यात आला; मात्र केंद्रीय विभागांकडून अद्याप मंजुरी मिळालेली नाही. या संदर्भात मुख्य सचिवांनी मार्चमध्ये आढावा बैठक घेतली असून मे महिन्यात पुन्हा बैठक अपेक्षित आहे. आमदार विजयकुमार देशमुख यांनीही या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

भूसंपादनातही विसंगती दिसून येते. पहिल्या टप्प्यातील (पुणा नाका ते पत्रकार भवन) १३७ मिळकतींपैकी १०० खासगी व ३७ शासकीय मिळकती आहेत. यापैकी ६१ खासगी मिळकती ताब्यात घेतल्या असल्या तरी शासकीय ३७ जागांचा ताबा अद्याप मिळालेला नाही. दुसऱ्या टप्प्यात (जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन) १११ मिळकतींपैकी ७२ टक्के जागा शासकीय असूनही ताबा मिळण्यात अडथळे आहेत. विभागांमधील ताळमेळाच्या अभावामुळे प्रकल्प रखडल्याचे स्पष्ट होत आहे.

दरम्यान, या प्रकल्पासाठी शासनाकडून १०१.९७ कोटी रुपये मंजूर झाले असून त्यापैकी ८४.४३ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. उर्वरित १७.१३ कोटी रुपये येणे बाकी आहेत. महापालिकेच्या वाट्याचे ३२.१० कोटींपैकी २५.५५ कोटी रुपये प्राप्त झाले असून ९.५५ कोटी रुपये अद्याप येणे बाकी आहेत.

उड्डाणपुलांच्या प्रश्नावर आठवडाभरात संबंधित विभागांची बैठक घेऊन अहवाल तयार करून मुख्यमंत्री यांची भेट घेणार असल्याचे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले. मात्र, दहा वर्षांनंतरही प्रकल्प कागदोपत्रीच राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

# ८० कोटींचे जलजीवन मिशन रखडले

## ५४ गावे अजूनही पाण्याविना

**सांगोला (कटूसत्य वृत्त) :** प्रत्येक गावात घरोघरी पाणी पोहोचवण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेल्या जलजीवन मिशन योजनेला सांगोला तालुक्यात मोठा फटका बसल्याचे चित्र आहे. सुमारे ८० कोटी रुपये खर्चूनही तब्बल चार वर्षांनंतर ५४ गावांतील ग्रामस्थांना अद्याप पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून, ही महत्त्वाकांक्षी योजना अपयशी ठरत असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सन २०२२ मध्ये तालुक्यातील ८५ गावांसाठी जलजीवन योजनेअंतर्गत घरोघरी पाणीपुरवठा करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला होता. पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाच्या माहितीनुसार, यापैकी ३१ गावांतील कामे पूर्ण झाली आहेत; मात्र उर्वरित ५४ गावांतील कामे अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. चार वर्षे उलटूनही योजना पूर्णत्वास न गेल्याने टंचाईच्या काळात नागरिकांना पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

सांगोला तालुका हा पाणीटंचाईग्रस्त म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी शिरभावी पाणीपुरवठा योजनेवर आधारित जलजीवन मिशन राबवण्यात आले. गावोगावी पाईपलाईन टाकण्यात आल्या; मात्र प्रत्यक्षात नळातून पाणीच येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आहे.

या योजनेवर सुरुवातीपासूनच आरोप-प्रत्यारोप झाले. शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), बहुजन समाज पार्टी आदी पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलने करत भ्रष्टाचाराचे आरोप केले. विद्यमान आमदार बाबासाहेब देशमुख यांनीही हा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. त्यानंतर पाणीपुरवठा अभियंत्यांची बदली करण्यात आली होती.

अनेक घडामोडींनंतरही कामे रखडल्याने कोट्यवधी रुपयांचा खर्च पाण्यात गेला का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून यंदा तरी या गावांना पाणी मिळवून द्यावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

८५ गावांसाठी सुमारे ८० कोटी रुपये मंजूर झाले असून ३१ गावांतील कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ५४ गावांतील कामे प्रगतिपथावर असली तरी मागील वर्षभरापासून निधीअभावी कामे ठप्प आहेत. निधी उपलब्ध होताच कामे पुन्हा सुरू करण्यात येतील, अशी माहिती पाणीपुरवठा अभियंता पुजारी यांनी दिली.

# अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली शिक्षक; शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त) :** सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतसरकारी हस्तक्षेप आणि शिक्षकांवर टाकल्या जाणाऱ्या अवाजवी अशैक्षणिक जबाबदाऱ्यांमुळे शिक्षणाची गुणवत्ता धोक्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातील बहुतांश प्रश्न शेवटी सरकारी व्यवस्थेकडेच येऊन थांबतात. त्यामुळे ही व्यवस्था मुळापासून सक्षम केल्याशिवाय शिक्षणाचे भवितव्य उज्ज्वल होणार नाही, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माजी अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी केले.

मंगळवेढा महोत्सव अंतर्गत ह्यशिक्षण : काल, आज आणि उद्याह्ल या विषयावरील व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. शनिवार, दि. २ मे रोजी यशवंत मैदान, इंग्लिश स्कूल येथे हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. प्रियदर्शनी महाडीक होत्या.

अध्यक्षीय भाषणात डॉ. महाडीक म्हणाल्या की, भारतात शिस्त हा सध्या सर्वात मोठा प्रश्न आहे. जपानप्रमाणे प्रभावी शिस्तीच्या पद्धती आपल्या शिक्षण प्रणालीत समाविष्ट करण्याची गरज आहे. ब्रिटिशकालीन शिक्षण पद्धतीत अपेक्षित बदल झालेले नाहीत. आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असूनही त्यावर देशात कमी आणि परदेशात अधिक संशोधन होत आहे, ही खेदाची बाब आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करणे हीच प्राथमिकता असली पाहिजे.

या कार्यक्रमास म.सा.प. जिल्हा प्रतिनिधी कल्याण शिंदे, पद्माकर कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, सहसचिव श्रीधर भोसले, डॉ. मीनाक्षी कदम, प्रा. तेजस्विनी कदम, अजिता भोसले, रामचंद्र नेहरवे, ॲड. शिवाजी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी शिंदे व गोरिमा शेख यांनी केले, तर आभार अश्पाक काझी यांनी मानले.

# सल्लाउद्दीन शेख यांना आदर्श सामाजिक पत्रकार पुरस्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** महात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था, ओगलेवाडी (कराड) यांच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त पद्मश्री वसंतदादा पाटील यांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमात सोलापूरचे पत्रकार सल्लाउद्दीन शेख यांना 'आदर्श सामाजिक पत्रकार' पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते शेख यांना सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणे, जनजागृती करणे तसेच समाजहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे या त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# भोंदूगिरीला प्रशासनाचे संरक्षण?

## आडम मास्तरांचा गंभीर आरोप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात बुवाबाजी वाढीस लागली असून काही प्रकरणांमध्ये सरकारकडूनच अप्रत्यक्ष संरक्षण दिले जात असल्याचा आरोप माजी आमदार नरसय्या आडम यांनी केला. अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याच्या अंमलबजावणीत त्रुटी असून, अशोक खरात प्रकरणात प्रशासनाची भूमिका समाधानकारक नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे समाजात चुकीचा संदेश जात असून भोंदूगिरीला खतपाणी मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सोलापूर शहर व जिल्हा यांच्या वतीने आयोजित 'फलज्योतिष आणि बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद' रविवारी इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) सभागृहात पार पडली. या परिषदेत आडम मास्तर उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमास ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज प्रमुख पाहुणे, तर अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी जिल्हाध्यक्ष धर्मराज चवरे, रमेश खाडे, सुधाकर काशिद, ॲड. गोविंद पाटील आदींसह अंनिसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिषदेत विविध सत्रांमधून अंधश्रद्धा व बुवाबाजीविरोधात प्रबोधन करण्यात आले. दुसऱ्या सत्रात 'फलज्योतिष : समज आणि वास्तव' या विषयावर डॉ. नितीन शिंदे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज अधोरेखित केली. या सत्राचे अध्यक्ष दत्ता चांदणे होते, तर डॉ. सचिन जम्मा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तिसऱ्या सत्रात 'राजकारण आणि बुवाबाजी' या विषयावर ह.भ.प. नितीन परभणीकर यांनी भाष्य करत समाजाने सजग राहण्याचे आवाहन केले. या सत्राचे अध्यक्षपद रवींद्र चिंचोळकर यांनी भूषविले.

समारोप सत्रात प्रा. एम. आर. कांबळे अध्यक्षस्थानी होते. नंदकुमार फाटे, रवींद्र मोकाशी आणि प्रा. प्रदीप जगताप यांनी मार्गदर्शन करत अंधश्रद्धा निर्मूलनासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज व्यक्त केली.

# अक्कलकोट तालुक्यात शेतकऱ्यांमध्ये संताप

**बोरेगाव (कटूसत्य वृत्त):** अक्कलकोट तालुक्यात गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील कांदा, सोयाबीन, उडीद, मूग, भुईमूग, तूर आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतात पाणी साचून पिके नष्ट झाली असतानाही अनेक शेतकऱ्यांचे पीक विमा दावे विमा कंपनीकडून नामंजूर करण्यात आल्याने तालुक्यात तीव्र नाराजी पसरली आहे.

सलग तीन महिने पडलेल्या संततधार पावसामुळे हजारो रुपये खर्च करून केलेली लागवड वाया गेली. सरासरीपेक्षा दुप्पट पावसाची नोंद झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला होता. नुकसानभरपाई मिळेल आणि किमान लागवडीचा खर्च तरी भरून निघेल, अशी अपेक्षा होती; मात्र ती फोल ठरली.

जून महिन्यात मृग नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने पेरण्या वेळेत झाल्या. परंतु जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर या तीन महिन्यांत झालेल्या अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान झाले. परिणामी, विमा भरलेल्या शेतकऱ्यांची संख्या मोठी असतानाही त्यांना अपेक्षित लाभ मिळालेला नाही.

दरम्यान, एक रुपयात पीक विमा भरण्याची योजना बंद झाल्याने शेतकऱ्यांना हजारो रुपये प्रीमियम भरावा लागला. त्यामुळे पिकेही गेली आणि विम्याचे पैसेही वाया गेल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळाला असताना अक्कलकोट तालुक्यात सर्वाधिक पाऊस होऊनही अनेकांना भरपाई मिळालेली नाही, त्यामुळे हा अन्याय असल्याची भावना तीव्र होत आहे.

### आयुक्त पातळीवर निर्णय

खरीप व रब्बी हंगामातील पीकविम्याचे दावे मंजूर किंवा नामंजूर करण्याचा निर्णय आयुक्त पातळीवर घेतला जातो. तालुक्यातील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ का मिळाला नाही, याबाबत माहिती घेतली जाईल, असे कृषी अधिकारी चंद्रकांत मंगरुळे यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांना न्याय द्या

'अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील सर्वच पिकांचे नुकसान झाले. संततधार पावसामुळे जमीन खरवडून गेल्याने अनेकांना रब्बी पेरणीही करता आली नाही. अनेक शेतकऱ्यांचे विमा दावे नाकारल्याने मोठा आर्थिक फटका बसला आहे. संबंधितांनी शेतकऱ्यांना न्याय द्यावा,' अशी मागणी शेतकरी हणमंत बणजगोळे यांनी केली.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणाच विद्यार्थ्यांचे भविष्य बदलवू शकते - जयकुमार माने



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील एच. एस.सी. बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्या प्रसंगी संस्थेचे मुख्य विश्वस्त व नगरसेवक श्री जयकुमार माने बोलत होते.

या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी आपले मत व्यक्त करत असताना त्यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता टिकवली तरच भविष्यकाळात आपली उन्नती करू शकतील तसेच शेतकरी, कष्टकरी व ग्रामीण भागातील विद्यार्थी अशा स्पर्धेच्या युगात आपली गुणवत्ता टिकून ठेवत असून तीच गुणवत्ता भविष्यकाळात त्यांच्या उपयोगी पडू शकते. बारावी ही विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाची मुख्य पायरी असून स्पर्धा परीक्षेसाठी अत्यंत उपयुक्त आहे असे मत त्यांनी व्यक्त व्यक्त करून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचा वाणिज्य विभागाचा निकाल 100 टक्के कला विभागाचा निकाल 85.19 टक्के व व्यवसाय शिक्षण विभागाचा निकाल 76.00 टक्के लागला असून वाणिज्य शाखेतून अनुक्रमे प्रथम समृद्धी पवार, द्वितीय समृद्धी सुरवसे व तृतीय गंगोत्री राठोड व सानिका व्हनकडे तर कला शाखेत प्रथम भाग्यश्री राजूरकर, द्वितीय तबस्सुम हुंडेकरी व तृतीय पल्लवी पवार व व्यवसाय शिक्षण विभागातून प्रथम आयुष शिवशिखरे, द्वितीय श्रीधर असबे व तृतीय वैभव माने स्थान यश प्राप्त केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांच्या हस्ते करण्यात आला.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीपराव माने, मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त स्वाती माने, प्राचार्य जयसिंग गायकवाड व पर्यवेक्षक वसंत गुंगे यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. संजय जाधव, प्रा.दादाराव डांगे, प्रा. हनमंत शिंदे, प्रा. दीपक शिंदे, प्रा. विजयकुमार वाळके, प्रा. विनोद थोरात, प्रा. राजीव निकम व प्रा. बंडोपंत बाबर यांनी मार्गदर्शन केले होते.

# बार्शीत कामगारांची मिरवणूक

## घोषणाबाजीने शहर दणाणले

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** शिकागोतील कामगार चळवळीचा इतिहास आणि त्याग विसरून चालणार नाही. सातत्यपूर्ण मार्क्सवादी संघर्षाच्या बळावर भांडवली व्यवस्थेला आव्हान देत कामगार वर्ग सत्तेपर्यंत पोहोचू शकतो, असा विश्वास प्रा. तानाजी ठोंबरे यांनी व्यक्त केला.

आयटक कामगार केंद्राच्या वतीने पुतळा पार्क येथून महापुरुषांना अभिवादन करून शहरातून घोषणाबाजीसह भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीचे पुढे सभेत रूपांतर झाले. त्यावेळी प्रा. ठोंबरे बोलत होते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ ही कामगार आणि शेतकऱ्यांच्या संघर्षातूनच साकार झाली, असे सांगताना त्यांनी सध्याच्या व्यवस्थेवर टीका केली. धर्मांध व भांडवली शक्ती एकत्र येऊन कामगार वर्गावर विविध मार्गांनी दबाव टाकत आहेत. कामगार व शेतकऱ्यांच्या विरोधात कायदे करून त्यांना कमकुवत करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

'सातत्यपूर्ण संघर्ष, विचार, अभ्यास आणि एकजुटीच्या बळावर कष्टकरी वर्गाचा 'लाल दिवस' दूर नाही,' असेही प्रा. ठोंबरे म्हणाले.

यावेळी ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे ए. बी. कुलकर्णी, डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल श्रमिक संघाचे लहू आगलावे, औषध निमार्ता संघटनेचे सूरज अन्नदाते, बांधकाम कामगार संघटनेचे अनिरुद्ध नखाते, अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कर्मचारी संघटनेचे प्रवीण मस्तुद, बार्शी नगरपालिका कंत्राटी कामगार संघटनेचे प्रतिनिधी तसेच युवराज घाडगे, केदार फुले, बाळासाहेब बाकले, भारत भोसले, भारती मस्तुद, आकाश लोंढे, सचिन काळे, मयूर ननवरे, अनिरुद्ध ओव्हाळ आदी उपस्थित होते.

# संभाजी ब्रिगेड च्या वतीने आरोपीचा भर चौकात जाळला पुतळा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे येथील नरसापुर या गावी झालेल्या चिमुरडीवर अत्याचाराच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडच्या वतीने चार हुतात्मा चौकात गुन्हेगार आरोपी भीमा कांबळे यांच्या प्रतिकात्मक पुतळा जाळून आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रात वारंवार महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत मुख्यमंत्री गृहमंत्री हे निष्क्रिय झाले असून गृहमंत्री पदाचा स्वतंत्र पदभार राज्य शासनाने निर्माण करावा महिला वरील अत्याचारासंदर्भात जलद न्यायालयाची स्थापना करण्यात यावी महाराष्ट्र शासनाने तात्काळ अधिवेशन बोलावून महिलां अत्याचार संदर्भात स्वतंत्र कायदा करण्यात यावा बलात्काराला भर चौकात तात्काळ फाशी देण्यात यावी अशा मागण्या करण्यात आल्या.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मिनल दास जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी, संजीवनी सलबत्ते, शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर, सरोजिनी माकाई, अनिता वाघमारे, जयश्री रानसरजे उद्योग आघाडीचे शहराध्यक्ष संतोष सुरवसे उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष विक्रम वानकर जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले जिल्हा सचिव दत्तात्रय डिंगणे कृष्णा पवार आदी उपस्थित होते.

# गाव विकासासाठी एकजुटीचे आवाहन

## तलाव खोलीकरणाची ग्वाही

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** चोपडी ग्रामस्थांनी झाडे जगवण्यासाठी संघर्ष करत पाण्याची व्यवस्था केली, ही प्रेरणादायी बाब आहे. पुढील काळात झाडांचे संवर्धन व्हावे यासाठी तलावाचे खोलीकरण करून पाणीसाठा वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिले. तसेच गावाच्या विकासासाठी सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.

चोपडी येथे सिद्धनाथ यात्रेनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांच्या बक्षीस वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या निमित्ताने ट्रॅक्टर शर्यत, खिलार बैल व गाय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

यात्रेदरम्यान शिवरत्न स्टीलतर्फे तीन दिवस मोफत शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले. तसेच 'शिवबा हेच का आपले सुराज्य' या नाटकाचे सादरीकरणही करण्यात आले.

कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब बाबर, सरपंच रामचंद्र केंगार, उपसरपंच माउली बाबर, संतोष बाबर, सिद्धनाथ मंदिरचे राजाराम बाबर, डॉ. नवनाथ बाबर, शिक्षक जनार्दन बाबर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.